# छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची धोरणे

**बेबी केशव खोरणे** संशोधक विद्यार्थिनी, इतिहास विभाग व संशोधन केंद्र, विवेकानंद कला सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर मो. 7038860795 ई-मेल- khoranebaby@gmail.com

---

**सारांश :**

छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते. आपल्या कारकीर्दीत त्यांनी अनेक धोरणांचा अवलंब केल्याचे दिसून येते. शिस्तबद्ध लष्कर, धार्मिक धोरण, शेतीविषयक धोरण, व्यापारविषयक धोरण, वतनदारविषयक धोरण इ. धोरणे त्यांनी आखून एकप्रकारे त्यामध्ये सुसूत्रता आणल्याचे दिसून येते. शिवाजी महाराजांकडे इतर साम्राज्याच्या तुलनेत छोटी पण सुसज्य अशी फौज होती या फौजेमध्ये सर्व धर्मांचे लोक होते. महाराजांनी स्वत:ची अशी युद्धनीती विकसित केली जिला गनिमी कावा म्हणून ओळखले जाते. शिवाजी महाराजांनी राज्यभिषेकाच्या समयी अष्टप्रधानाची नियुक्ती केली. अष्टप्रधानाची कर्तव्ये आणि कार्यभार यांचे तपशील कानुजाबतात देण्यात आले आहेत. राज्यभिषिकानिमित्त होन व शिवराई ही नावे पाडून त्यावर राजा शिवछत्रपती अशी अक्षरे घातली. महाराजांनी वतनदारांचे हक्क नियंत्रित केले. लष्कराला नियमित वेतन देण्याची पद्धत सुरू केली. शिवपूर्वकाळात शासनसंस्था आणि तिचे अधिकारी शेतकऱ्यांकडून त्यांच्या उत्पन्नाच्या 50 टक्क्यांपेक्षा जास्त सारा वसूल करत यांची छत्रपतींना जाणीव होती. शेतकऱ्यांची पिळवणूक होत असे. बहुसंख्य प्रजा शेतीवरच अवलंबून असल्याने शेतीची सुधारणा हे महाराजांचे राज्यकारभारातील महत्त्वाचे सूत्र होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केले त्यामागे त्यांचे वडील शहाजीराजे व राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेबांची प्रेरणा होती. शुन्यामधून स्वराज्य निर्माण करण्याचे अलौकिक कार्य शिवाजी महाराजांनी करून दाखविले. त्यांनी स्थापन केलेल्या राज्यांचे मोठे वैशिष्ट्य असे होते की हे राज्य भोसले वंशाचे राज्य असूनही सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी स्थापन करण्यात आलेले राज्य होते. त्यामुळेच रामदास स्वामींनी आपल्या एकाच ओवीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज कसे होते हे स्पष्ट केल्याचे दिसून येते. आपल्या राज्यातील रयतेच्या सुखासाठी रात्रंदिवस प्रयत्न करणारा महान पुरूष म्हणून शिवाजी महाराजांची योग्यता मोठी होती.

**प्रस्तावना :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतिकूल परिस्थिती असताना स्वराज्याची निर्मिती केली. सुप्रसिद्ध विचारवंत व थोर तत्त्ववेत्ता कार्लाईलने म्हटल्याप्रमाणे, "मनुष्याने केलेल्या समाज व्यवस्था ढासळल्या तरी परमेश्वराच्या कृपेने प्रत्येक प्रगमनशील समाजात परमेश्वराचे अंश अवतीर्ण झालेच पाहिजेत व प्रत्येक प्रगमनशील समाजात अशा पुरूषांविषयी प्रेम, आदर व पूज्यभाव सदोदित जागृत राहिला पाहिजे." या दृष्टीने जसे जर्मनीत ल्यूथर किंवा ा प्रिंस बिस्मार्क उत्पन्न होऊन प्रिय झाले. इंग्लंडमध्ये पिट, हापडेन व ड्यूक ऑफ वेलिंग्टन, फ्रान्समध्ये जोन ऑफ आर्क व व्हाल्टेअर, स्कॉटलँडमध्ये वॅलिस, रशियात पीटर द ग्रेट अमेरिकेत वाशिंग्टन त्याचप्रमाणे आपल्या या महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज उत्पन्न होऊन ते आपल्या सत्कृतीने प्रत्येक महाराष्ट्रीयास प्रिय व पूज्य झाले आहेत असे श्री चि.वि.वैद्य लिहितात. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतीय इतिहासात शिवाजी महाराजांचे स्थान फार महत्त्वपूर्ण आहे तो एक थेर राष्ट्रनिर्माता आणि स्वराज्यसंस्थापक मानला जातो. त्याचे साहस व बुद्धिमत्ता, मुत्सद्देगिरी व शासन कौशल्य, नितिमत्ता आणि चारित्रिक अशा आदर्शामुळे सर्व भारतीयांच्या मनावर त्यांनी मोहिनी घातली आहे. महाराष्ट्रवासियांना त्यांच्याबद्दल अपार श्रद्धा व आदर आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे जनसामान्य जनतेचे हित जोपासणारे होते. त्यामुळे हे आपले राजे आहेत असे सर्वांनाच वाटते तसेच त्यांचे कार्य ही अलौकिक असेच होते. महाराष्ट्रात स्वराज्याच्या रूपाने स्वतंत्र व सार्वभौम राज्य स्थापन करण्याचे कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी केले.[1]

**2) विषय निवडीचा हेतू :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा धोरणाचा तसेच जी प्रशासन व्यवस्था मजबूत करण्यासाठी व रयतेला हे आपले राज्य वाटावे या दृष्टिकोनातून अनेक धोरणांचा अभ्यास या शोधनिबंधाच्या माध्यमातून केला जाईल.

**3) संशोधन पद्धती :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची धोरणे या शोधनिबंधाकरिता वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला गेला आहे. याची मांडणी करत असताना विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे आणि इंटरनेटच्या माध्यमातून शोधनिबंध पुर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

4) शिवछत्रपतीच्या जीवनाचे शिल्पकार म्हणून त्यांची माता जिजाबाई व त्यांनी पुण्यात पदन्यास केल्यापासून त्यांचे मार्गदर्शक असलेले दादोजी कोंडदेव ह्यांचे महत्त्व अनन्य साधारण आहे. शिवरायांना काही गोष्टींची स्फूर्ति त्यांचे वडील शहाजीराजे यांच्याकडून मिळाली होती. व त्यांच्या स्वराज्य साधनेला धर्मराज्याचे व्यापक अधिष्ठान प्राप्त करून देऊन त्यांच्या जीवनमंदिरावर आध्यात्मिक जीवनदृष्टीचा सुवर्णकळस त्यांचे सद्गुरू श्री समर्थ रामदास यांनी चढविलेला आहे. ही गोष्ट खरी असली तरी जीवन मंदिराचे शिल्पकार म्हणून जिजाबाई व दादोजी कोंडदेव यांचाच निर्देश प्रथम केला पाहिजे. पित्याजवळून शिवछत्रपतींना कर्तृत्व, मुत्सद्देगिरी व सेनापतित्त्व या देणग्या प्राप्त झाल्या असे म्हणता येईल. पण वयाच्या बाराव्या वर्षापासून त्यांच्या जीवनाची घडण त्यांच्या मातेने

घडविलेले आहे. जिजाबाईंच्या अंगी स्वभावत:च अनेक अलौकिक गुण होते आणि विशिष्ट संकटमय परिस्थितीशी झगडण्यात त्यांचे जीवन गेल्यामुळे ते अधिकच धारदार बनले होते.

जिजामातेने शिवरायांच्या लहानपणीच स्वत: अनेक तंट्याचे निर्णय केलेले आहे. जिजाबाईने लहानग्या शिवरायांच्या अंतकरणावर धर्मनिष्ठा, स्वातंत्र्य लालसा, चरित्र्यनिष्ठा व स्वाभिमान हे संस्कार त्यांनी केले. त्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या अंगी गुणविशेषांचा अलौकिक वारसा मातेकडूनच आलेला आहे.[2] त्या गुणविशेषाच्या आधारावर त्यांनी पुढीलप्रमाणे धोरणे अवलंबिली.

**1) छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण :**

शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण सहिष्णूतेचे होते. सर्व धर्म श्रेष्ठ असून परमेश्वर हा एकाच आहे असा महान विचार महाराजांनी औरंगजेबाला लिहिलेल्या पत्रामध्ये आढळतो. ते पत्रात लिहितात की मशिदीमध्ये परमेश्वराचे स्मरण करण्यासाठी भक्तजन बांग देतात तर मंदिरामध्ये घंटानाद करता ही सृष्टी म्हणजे परमेश्वराचे निर्माण केलेले एक उत्कृष्ट चित्र आहे. अशाप्रकारचे मौलिक विचार शिवाजी महाराजांचे होते. स्वराज्यामध्ये प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याची मुभा महाराजांनी दिलेली होती. साधूसंतांचा आदर करणे, सांस्कृतिक परंपरा जतन करणे आणि धर्मस्थानाचे रक्षण करणे हे आपले आद्य कर्तव्य महाराज मानत असत. हिंदू मंदिराप्रमाणे मुसलमानाच्या धर्मस्थानांही त्यांनी उदारपणे देणग्या दिलेल्या आढळतात. सभासदाने आपल्या बखरीमध्ये महाराजांनी धर्मादाय व्यवस्था कशी लावली होती त्याचे वर्णन केलेले आहे. मुलखात देव देवथान जागोजागी होती त्यास दिवाबत्ती, नैवैद्य, अभिषेक, स्थान पाहून चालविले, मुसलमानाचे पीर, मशिदी त्यांचे दिवाबत्ती नैवैद्य स्थान पाहून चालविले. सर्व धर्मांना श्रेष्ठ मानत असल्यामुळे शिवाजी महाराज सहिष्णू वृत्तीचे होते.[3]

म्हणूनच आपल्या पदरी कितीतरी मुसलमान सरदार त्यांनी नेमले होते. दौलतखान हा आरमाराचा प्रमुख होता. तर मदारी मेहतर हा महाराजांचा आवडता सेवक होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाची समकालीन दरबारी लेखकांनी स्तुती केलेली आढळते. खाफीखान लिहितो की, "शिवाजीने आपल्या सैनिकाकरिता असा सक्त नियम केला होता कि सैनिक ज्या ज्या ठिकाणी लूटालूट करण्यास जातील तेथे तेथे त्यांनी मशिदीस, कुराण ग्रंथास अथवा कोणत्याही स्त्रीस तोशीय अगर त्रास देऊ नये, जर एखादा कुराणाचा ग्रंथ त्यांच्या हाती आला तर त्याबद्दल पूज्यभाव दाखवून तो आपले मुसलमान नोकराचे स्वाधीन करत असे. शिवाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाचा एक विशेष म्हणजे अंधश्रद्धा आणि रूढीप्रियता त्यांना मान्य नव्हती. तसेच शिवाजी महाराजांचे काही सैनिक औरंगजेबाने त्यांचे धर्मांतर केले परंतु ते महाराजांकडे आल्यानंतर त्यांनी शुद्धीकरण करून आपल्या धर्मात सामावून घेतले. याचे पुरावे आपल्याला इतिहासात पाहायला मिळतात. संस्कृती रक्षण आणि आत्मसम्मान वाढविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिवाजी महाराजांनी केले. अशा प्रकारचे धार्मिक धोरण महाराजांचे होते.[4]

**2) छत्रपती शिवाजी महाराजांचे युद्धनीतीचे धोरण :**

साम, दाम, दंड, भेद अशी चतुर्विध युद्धनीती प्राचीन काळापासून भारतास अवगत आहे. या चार प्रकारात छंद्य या पाचव्या प्रकाराचा समावेश करणे भाग आहे. मुसलमानाच्या युद्धनीतीत हा पाचवा प्रकार होता, तोच शिवाजी महाराजांनी आपल्या युद्धनीतीत घेतला. मराठ्यांच्या एक विशिष्ट युद्ध पद्धतीस गनिमी कावा म्हणतात. गनीम म्हणजे शत्रू, त्याच्याशी करावयाचा कावा तो गनिमी कावा या युद्ध पद्धती छत्रपती शिवाजी महाराज अगदी तरबेज होते. त्यामधले एक गुरू असे म्हटले तरी चालेल. गनिमी कावा म्हणजे शत्रूला तोंड देऊन न लढता त्याच्या भोवताली घिरट्या घालून त्यांची रसद तोडणे, त्यांच्या सभोवारचा मुलूख बेचिराख करून त्याला अन्नपाणी मिळू न देणे, तो युद्धात गुंतला असता त्याच्या राज्यात शिरून लुटमार करणे या उपायाने त्याला आपल्या राज्याच्या रक्षणार्थ परत जाण्यास भाग पाडणे व त्याच्या छावणीवर वारंवार छापे घालून त्याचे बळ छाटणे. या पद्धतीचा अवलंब दूर्बल पक्षाला प्रबल पक्षाविरूद्ध करावा लागतो. यास विजयाचे धोरण न म्हणता बचावाचे वा आत्मरक्षणाचे धोरण म्हणता येईल. या धोरणास डोंगराळ व झाडीचा प्रदेश सोयीचा. शिवाजीचे कोकण व मावळ प्रदेशातील राज्य या धोरणास सोयीचे होते. फत्तेखान, अफजलखान, रूस्तुमजा, सिद्दी जौहार, शाहिस्तेखान जयसिंग इत्यादी सरदार त्याजवर चाल करून आले. तेव्हा शिवाजीने डावपेच लढविले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचे वर्णन अनेक बखरीतही पाहायला मिळते. हेरगिरी हा प्रकार भारतात पुरातन काळापासून अवगत आहे. शिवाजी महाराजाचे हे खाते त्यांच्या इतर सैनिकी खात्याप्रमाणे अत्यंत कार्यकूशल होते. त्याचा बहिर्जी नाईक हा हेर तर इतिहास प्रसिद्ध आहे. सूरतेची लूट करण्यास जाण्यापूर्वी सुरतेची कच्ची माहिती काढण्यासाठी शिवाजीने बर्हिजी नाईकासच पाठविले होते. तसेच अफजलखानानाची जावळी खोऱ्यात भेट घेण्यापूर्वी त्यांच्या हालचालीची माहिती काढण्याकरिता आपला पाच सहस्त्र मावळयांचा एक सरदार विश्वासराव नानाजी प्रभु मुसे खोरेकर यास शिवाजीने छावणीत नेमले होते. तो दररोज रात्री फकिराचा वेश घेऊन खानच्या छावणीत भिक्षेच्या मिषाने जात असे व अफजलखानाच्या बैठकीत जे खलबत चाले त्यांची बारीक माहिती घेऊन येत असे. (शि.दि. पान 159) कर्नाटकातील दिग्विजयास निघण्यापूर्वी त्या प्रांतात त्याने असेच हेरांचे जाळे पसरून ठेवले होते.[6] अशा प्रकारच्या कार्यात छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांच्या सैनिकांनी खुप मोलाची माहिती, बातम्या, शत्रूचे डावपेच, हालचाली इत्यादींच्या माध्यमातून मदत केल्यामुळे अनेक लढायामध्ये यश संपादन करता आले.

**3) छत्रपती शिवाजी महाराजांचे शेतकरी व कृषीविषयक धोरण :**

स्वराज्यात आपल्या प्रजेची, शेतकऱ्यांची काळजी महाराजांनी घेतली. शेतकरी म्हणजे रयत, प्रजा त्यांनी राबवून कसून मेहनत करावी, पिके पिकवावी आणि स्वत:ला राजे म्हणविणाऱ्यांनी त्यांनी पिकवलेली पिके कधी गोडी गुलाबीने तर कधी निर्घुणपणे काढून. न्यावीत. महात्मा ज्योतिबा फुल्यांनी म्हटल्याप्रमाणे भटशाहीने शेतकऱ्यांवर केलेल्या आक्रमणाची" ती सुरूवात असेल. निश्चितपणे काहीही म्हणणे कठीण आहे पण जे ग्रंथकारांना जमले नाही. ते गावोगावच्या घरी घरातील मायमाऊल्यांनी करून दाखविले. बळीराजाला जमिनीत गाडून टाकला समुळ नष्ट केला तरीही शेतकऱ्यांच्या बाया "इडा पिडा टळो बळीचे राज्य येवो" या आशेची ज्योत हर प्रसंगी जिवंत ठेवत असतात. हजारो हजार वर्ष आपल्या एका राज्याचे इतक्या मोठ्या समाजाने इतक्या कृतज्ञतापूर्वक स्मरण ठेवल्याचे दूसरे उदाहरण असेल.'[7]

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे दूसरे दैवत म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय. शिवाजी राजाविषयीचा अभिमान प्रत्येक मराठी शेतकऱ्यांच्या जणू रक्तातच असते. इतिहास संशोधकांनी विचारवंतांनी आपल्या दृष्टीकोनातून छत्रपती शिवाजी महाराज हे मावळयांचे राजे होते. इतक्या स्पष्टपणे त्यांच्या जीवनकाळाचा अर्थ कोणी लावला नाही कारण असा खरा अर्थ शेतकऱ्यांपुढे येणे त्यांच्या दृष्टीने सोयीचेही नव्हते. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचा राजा कधी मिळालाच नाही. शिवपूर्वकालीन अवस्था ही कोणीही येऊन रयतेस लुटावे आणि राज्य करावे अशी राहिली. पण स्वराज्याची मुहूर्तमेढ करताना व नंतरही महाराजांनी प्रसंगी अतिशय कठोरतेने मुदुतेने, सामंजस्याने, गनिमी काव्याने सर्व बुद्धिकौशल्य पणाला लावून पहिल्यांदा शेतकऱ्यांचे राज्य निर्माण केले वाढवले, व हरवलेली सुरक्षितता परत मिळवून दिली.

जनसामान्याचा म्हणजे शेतकऱ्यांचा राजा शिवाजी महाराजांच्या अनेक प्रसंगामधून दाखविता येईल. व्यक्तिगत मानसन्मानाचा प्रश्न कधी प्रतिष्ठेचा होऊ न देता प्रसंगी शेतकऱ्यांच्या हिताचे व शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी शिवाजीराजाने माघारसुद्धा घेतली नाही. विजापूरकरांच्या पहिल्या आक्रमणात शत्रु सैन्याला आपल्या रयतेच्या मुलूखात घुसू दिले नाही. स्वराज्याच्या सीमेवरच्या पुरंदर गडाखाली बाजी पासलकर वगळता कोणीही वतनदार म्हणजे वतनदाराच्या पदरीचे सैन्य महाराजांबरोबर नव्हते. कान्होजी जेथे त्यावेळी शहाजी राजांबरोबर कर्नाटकातच होते. केवळ यावेळी मावळे शेतकरी धारकरी पोरं त्या युद्धात लढली व विजयी झाली. एक नवा जोम मावळी मुलखात पसरला आपली शेतीभाती तर करू शकतोच शेतीच्या संरक्षणाची व्यवस्था, त्याचबरोबर बादशाही सैन्याला पराभूत करू शकतो. हे रयतेतून उभ्या राहिलेल्या धारकऱ्यांना आणि त्याचबरोबर रयतेला कळून आले. हा आत्मविश्वास रयतेच्या मनात फक्त छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केला.[8]

**4) छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यापारविषयक धोरण :**

आपल्या राज्यातील वस्तूंचा व्यापार वाढावा म्हणून परराज्यातून येणाऱ्या मालावर जबर कट बसवून स्वदेशी मालाला संरक्षण देण्याचे धोरण सर्व आधुनिक देश वापरित आले आहे. परंतु सरंजामशाहीच्या मध्ययुगातसुद्धा शिवाजी महाराजांनी असा कट बसवून देशी व्यापारास व उद्योगास उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारले होते असे दिसते. 6 डिसेंबर 1671 रोजी महाराजांनी कोकणातील कुडाळचे सर सुभेदार नरहरी आनंदराव यांना एक पत्र लिहिले आहे. त्या पत्रात महाराज लिहितात, "संगमेश्वराहून बारदेशीचे मीठ महागच पडे ऐसा जकातीचा तह देणे, जरी जबरी जातीचा तह न द्याल, मुलाहिजा कराल म्हणजे कुल उदमी खळक बारदेशाकडे बोहडेल आपली कुल बंदरे पडतील. ऐसी गोष्ट आहे. तरी रोखा पावेल तेच घटिकेस कुल घाटी जकाती जबर करणे. महाराजांच्या दूरदृष्टीचा आणि सर्वंकष दृष्टीचा हा आणखी एक पैलू आहे. स्वराज्यातील शेतीबरोबरच व्यापार उदिमाचीही काळजी महाराज घेत असत.

आज्ञापत्र या ग्रंथात महाराजांचे व्यापारी धोरण अधिक विस्ताराने स्पष्ट होते. आज्ञापत्रातील साहूकार हे प्रकरण शिवाजीराजे हे व्यापार वाढावा यासाठी किती दक्ष होते ही गोष्ट स्पष्ट करतात. साहूकार याचा अर्थ आज्ञापत्रात भांडवलदार व्यापारी या अर्थाने वापरला नाही. उद्योगाशिवाय प्रगती नाही, व्यापाराशिवाय प्रगती नाही हे छत्रपती शिवाजी महाराजांना माहित होते म्हणूनच त्यांनी व्यापाराला प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते.[9]

**5) छत्रपती शिवाजी महाराजांचे वतन विषयक धोरण :**

वतन याचा अर्थ सरकारकडून एखाद्या ग्रामधिकाऱ्यास पाटील कुलकर्णी, देशमुख यांना त्यांच्या सेवेच्या मोबदल्यास मिळालेली देणगी ही वंश परंपरागत असे. शिवराय वतन संस्थेच्या पुर्ण विरोधात होते. कारण एकतर हे देशमुख, देशपांडे, वतनदार, मोकासेदार मन मानेल तशी रयतेकडून वसुली करत आणि जनतेला लुबाडीत असे. तसेच या वतनदाराच्या गढ्या बळकट असत त्यांच्याजवळ फौज असे. त्यामुळे ते सत्तेच्या विरूद्ध भांडत आणि आपले वतन सुरक्षित ठेवण्यासाठी केव्हाही शत्रूला सामील होत वतनदारांना स्वत:चे चैन भोगविलास असत. त्यामुळे स्त्रीची अब्रु सुरक्षित नव्हती. पुरूषांच्या स्वाभिमान सुरक्षित नव्हता हे सारे स्वधर्मिय लोक होते.[10]

या पुंड पाळेगारांचा बंदोबस्त ही महत्त्वाची कामगिरी महाराजांनी बजावली स्वराज्यातील मुलखात शिवरायांनी अशी काही व्यवस्था लावली की तिच्याकडून होणारी समाजाची पिळवणूक बंद पडली रयतेच्या शोषणावर आधारलेली वतन संस्था प्रथम निष्प्रभ करावयाची व नंतर तिचे समुळ उच्चाटन करावयाचे अशी महाराजांची योजना होती. या योजनेनुसार शिवरायांनी अफजलखान वधानंतर वाईपासून कोल्हापूरपर्यंतचा प्रदेश जिंकून स्वराज्यात आणल्यावर त्या प्रदेशातील वतनदाराची वतने, इनामे बरखास्त केली.

शिवाजी महाराजांनी स्वराज्यात मुलूख आल्यावर त्यातील कुलवतनदाराच्या वृत्ती अमानत केल्या. त्याबरोबर ब्राह्मणाच्याही वृत्ती अनाम केल्या. अशा प्रकारे जे वतनविषयक धोरण आहे ते रयतेचा छळ करणारे असल्यामुळे ते पूर्णपणे समुळ नष्ट केले.

**5) निष्कर्ष :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या जनतेच्या राज्यात सर्वसामान्य जनतेला राज्याविषयी आपूलकी दिसून येते. महाराजांची जी काही धोरणे होती ती जनतेच्या हिताची होती. प्रजेचे हित तेच राजाचे हित या प्राचीन विचासरणीला अनुसूरन शिवाजी महाराज वागत असत. तसेच त्यांच्या स्वराज्यांमध्ये सर्व धर्मियांना समान वागूणक होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या कार्यात जसे हिंदू धर्मातील अनेक जाती-जमातींना सामावून घेतले होते तसेच मुस्लीम धर्मातील काहींना अंगरक्षक, तोफखाना, आरमार हे पद देऊन त्यांनी एकप्रकारे जातीपातीच्या पलीकडे जाऊन मध्ययुगात हिंदवी स्वराज्य निर्माण केल्याचे दिसून येते. स्वराज्यातील शेतीबरोबरच व्यापार उदिमांचीही काळजी महाराजांनी घेतली. लष्करी व्यवस्था ही शत्रूचा नि:पात करेल इतकी सक्षम होती लष्कारतही अनेक जाती धर्माचे लोक होते. शत्रूपक्षातील अनाथ मुले, स्त्रिया, यांना त्रास देऊ नये अशी सक्त ताकीद महाराजांची होती. सर्व धर्मियांचा साधू, संत, फकीर यांचा मानसम्मान राखला जावा. अशी आज्ञा त्यांनी आपल्या सैनिकांना दिली होती. यावरून असे दिसून येते की छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेला आपले राजे आहेत असे वाटत होते.

**संदर्भ सूची**

1. बारगळ बा.सा. /ढवळे प्र.कृ. मराठ्यांचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट 1988, पृ.क्र. 15
2. बाळशास्त्री हरदास, छत्रपती शिवाजी (पूर्वाध), 1958, प्रथम आवृत्ती, पृ.क्र. 47
3. देशपांडे प्र.न., छत्रपती शिवाजी महाराज, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती 2002, पृ.क्र. 117, 118
4. भावे कृष्णा वासूदेव, शिवकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, प्रा.लि., पुणे तिसरी आवृत्ती 2010, पृ.क्र. 106, 117
5. जोशी शरद, शेतकऱ्यांचा राजा शिवाजी आणि इतर लेख, शेतकरी प्रकाशन, प्रथमावृत्ती, 1988, पृ.क्र. 6, 7
6. पानसरे गोविंद, शिवाजी कोण होता? लोकवाङ्मय गृह, मुंबई, तिसरी आवृत्ती, 2008, पृ. क्र. 31, 32
7. खोबरेकर गो.वि., शिवकाल (महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड भाग 1), प्रथमावृत्ती 2006, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.क्र. 447
8. Mahasawmawad.in, 5 June 2021, भामरे सर्जेराव, मुख्य सचिव राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
9. मानवतावादी लोक कल्याणकारी राजा छत्रपती शिवाजी महाराज, सकाळ वृत्तसेवा, 19 फेब्रुवारी 2020
10. Chhatrapati Shivaji Maharaj History in Marathi, 27 June 2017
11. https://mr.maharashtra.wikipedia.org, Date : 08/03/2024, Time:2.00pm